नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/१०/२०२४ (शनिवार) सायंकाळ**

---

## पोलीस ठाणे जलालखेडा हद्दितील मौजा उमठा (पारधी बेडा) शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर दारूबंदी कायद्यांतर्गत कायदेशीर कार्यवाही

अगामी विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने सदर निवडणुक निर्भय व शांत वातावरणात पार पडून निवडणुक प्रक्रिया दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधी राहणेकरीता आज दिनांक १९/१०/२०२४ रोजी पोलीस ठाणे जलालखेडा हद्दीमध्ये पोलीस ठाणे जलालखेडा येथील स्टापच्या सहाय्याने मौजा उमठा (पारधी बेडा) येथे अवैध्य दारूबाबत विशेष मोहीम राबवुन मोहीमे दरम्यान ०३ वेगवेगळ्या ठिकाणी दारूबंदी कायद्यांतर्गत कारवाया करण्यात आल्या त्यामध्ये ०३ आरोपी यांचे ताब्यातुन एकुण ५२० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ५२०००/— रूपयाचा मुद्देमाल तसेच सदर बेडयाच्या आजुबाजुला शोध घेतला असता १९ प्लॅस्टिकचे ड्रम त्यामध्ये ३८०० लिटर सडवा रसायन किंमत १३३०००/— रूपयेचा माल तसेच ड्रम व ईतर साहीत्य १४४००/— रूपये असा एकुण १९९४००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही मा. हर्ष पोद्दार साहेब, (पोलीस अधिक्षक सा. (नागपूर ग्रा), मा. रमेश धुमाळ साहेब, (अपर पोलीस अधिक्षक सा. मा. बापु रोहोम साहेब उपविभागीय पोलीस अधिकारी सा. (काटोल वि. काटोल) यांचे मार्गदर्शनात जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि तुषार चव्हाण साहेब, सफौ पुरूषोत्तम धोंडे, सफौ हरिहर सोनोने, पोहवा निलेश खरडे, पोहवा आशिष हिरूळकर, पोशि किशोर कांडेलकर, पोशि शिवदास सौंदळे, महिला पोशि ललिता चौधरी यांचे पथकाने केली असुन पुढील तपास निलेश खरडे व आशिष हिरूळकर हे करित आहे.

## प्राणांतिक अपघात

**पोस्टे मौदाः—** अंतर्गत मौजा महालगाव ते दिघोरी काळे येथे दि. ०८/१०/२०२४ चे १८.०० वा. ते १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे वडील मृतक नामे— विनोद यादवराव पाघ्ये, वय ६२ वर्ष रा. प्लॉट क्र. १६७ सुभेदार ले आउट नागपुर हे आपले घरून सायकलने नागपुर वरून दिघोरी काळे येथे जात असतांना यातील **आरोपी नामे— संतोश दुर्गाप्रसाद नेवारे वय २५ रा. दिघोरी काळे** याने आपले ताब्यातील शाईन मो.सा.क्र. एम.एच ४०—बी.एक्स—५१०४ नि वेगाने व लापरवाईने चालवुन फिर्यादीचे सायकलला धडक दिल्याने फिर्यादीचे वडिलाचे डोक्याला ,छातीला ,हाताला गंभीर मार लागल्याने पुढील वैद्यकीय उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपूर येथे भर्ती केले असता उपचारादरम्यान दि. ११.१०.२४ रोजी मरन पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मोहन विनोद पाघ्ये वय २७ वर्ष, रा. प्लॉट क्र. १६७ सुभेदार ले आउट नागपुर यांचे रीपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे आरोपीविरूद्ध कलम २८१ १२५ (बी) १०६(१) भा.न्या.सं सह क. .१८४ मो.वा.का अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मनोज चौधरी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर